ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

**A Peer Reviewed Bimonthly International Journal**

VOL. 4 NO. 6 SPECIAL ISSUE DECEMBER 2018 IMPACT FACTOR:4.197(IIJIF)



*Special Issue On*

## PROBLEMS AND CHALLENGES BEFORE THE WORKING WOMEN

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. Sunita Tengse**

*Assistant Editor*

**Dr. M. B. Patil**

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

6

# कौटुंबिक हिंसाचार अधिनियम- २००५ आणि स्त्रियांच्या सामाजिक समस्या

ईश्वर लक्ष्मण राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना:-**

महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई या थोर समाजसुधारकांनी, क्रांतीकारकांनी स्त्रीमुक्तीचा जागर करुन स्त्रियांना बंधनातून मुक्त करण्यासाठी चळवळ उभी केली आणि प्रबोधनाच्या माध्यमातून बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला. परंपरेचा आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेला विरोध करुन स्त्री जीवनाला स्वावलंबी बनविण्यासाठी लेखणीच्या माध्यमातून परिवर्तन करण्याचे कार्य देखील समाजसुधारकांनी केले.

प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या पाठीमागे कोणत्या तरी एका स्त्री चा फार मोठा हातभार असतो, असे म्हणले जाते. त्यामध्ये आई, बहिण आणि पत्नी देखील असू शकते. परंतू आज या देशात आपणास असे कायदे करावे लागत आहे की, आपल्या आई, बहिण आणि पत्नी वर होणाऱ्या अन्यायाविरुध्द त्यांना न्याय मागण्यासाठी न्यायालयाच्या उंबरवटयावर जावे लागत आहे. संपुर्ण देशात पारंपारिक विचारांचा पगडा पडलेल्या लोक समूदायात आज २१ व्या शतकात देखील स्वतः मध्ये व कुटुंबातील सदस्यामध्ये बदल होऊ दिलेला नाही. म्हणजेच या समुदायातील सदस्यामध्ये आजही स्त्रियांच्या बाबतीत नकारात्मक विचार असलेले दिसून येते. स्त्रियांचे शोषण पारंपारिक ते आजच्या आधुनिक समाजात देखील मोठया प्रमाणात होत असलेले दिसून येते. म्हणून राज्य असेल अथवा देश या सर्व प्रदेशात महिलांच्या सुरक्षिततेसाठी, महिलांच्या अन्यायाविरुध्द, महिलांना बंधनातून मुक्त करण्यासाठी सरकार आणि शासनाच्या माध्यमातून कायदे करुन संरक्षण देणे फार गरजेचे आहे. महिलांच्या न्याय-हक्कासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करुन महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात भारतीय समाजव्यवस्थेत आपणास कोणत्या तरी क्षेत्रात प्रगती होत असलेली दिसून येते. परंतू स्त्री-पुरुष विषमता मात्र आजही कमी झालेली नाही असेच म्हणावे लागेल. कारण आज सुध्दा विकसनशिल आणि विकसित देशात महिलांच्या संरक्षणार्थ कायदे करावे लागते आहे. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम- २००५ असे कायदे करुन महिलांना संरक्षण देण्याची गरज आज देखील आहे. अशा अनेक समस्या आहेत की, महिला त्यांच्या दैनंदिन जीवनात



Scanned with OKEN Scanner

सामोरे जात असताना दिसून येते. म्हणून प्रत्येक माणसांची जबाबदारी आहे की, आपली नैतिकता जागरुक करुन आपण आपल्या आई, बहिण आणि पत्नीचे संरक्षणाची जबाबदारी ज्या पध्दतीने पार पाडत असतो, अशीच जबाबदारी आपण राज्य, देशातील तमाम नारी जीवनाच्या परिवर्तनासाठी प्रयत्न केले पाहिजे. तेव्हाच या देशातील महिला सक्षमपणे स्वबळावर कार्य करुन कौंटुबिक जीवनात यशस्वी होवू शकते.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. कौंटुबिक हिंसाचार कायद्याचे अध्ययन करणे.

२. कौंटुबिक हिंसाचार कायद्याचे समाज मनावरील प्रभाव जाणून घेणे.

३. स्त्रियांच्या सामाजिक समस्या जाणून घेणे.

**गृहितकृत्ये:-**

- कौंटुबिक हिंसाचार कायद्यामुळे स्त्रियांवर होणारे अत्याचार कमी होतील.
- कौंटुबिक हिंसाचार कायद्याचा प्रभाव पुरुषप्रधान संस्कृतीची मक्तेदारी असणाऱ्या पुरुष वर्गावर झाला.
- स्त्रियाच्या सामाजिक समस्या वेगवेगळया क्षेत्रात दिसून येतात.

**संशोधन पध्दती:-**

शोध निबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याचप्रमाणे शोधनिबंधात देखील एखादी समस्या निश्चित करुन त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी प्रामुख्याने द्वित्तीयक तथ्यांचा आधार घेण्यात आले असून ही तथ्ये सबंधित साहित्यांचा आधार घेवून माहिती संकलित करुन लिहिला आहे.

**कौटुंबिक हिंसाचाराचा अर्थ:-**

स्त्रियांविरुध्द विविध प्रकारच्या तऱ्हेने होत असलेल्या हिंसाचाराला समजून घेण्यापूर्वी हिंसाचार म्हणजे नेमके काय हे समजून घेणे आवश्यक बनते. हिंसा ही संकल्पना स्पष्ट करताना गिल्स म्हणतात, एखाद्या व्यक्तीला प्रत्यक्षात इजा किंवा जखमी करण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला म्हणजे हिंसा होय. ट्रॉस यांनी हिंसात्मक कृत्याचे वर्णन करताना असे म्हणतात, अशी कृती की ज्या मध्ये दुखापत करण्याची प्रचंड क्षमता असते असे केले आहे. हिंसेचे क्रियात्मक स्पष्टीकरण असे लक्षात येते की, काही तरी देण्याची व्यक्तीची इच्छा नसतांना छुप्या किंवा उघडरित्या ताकदीचा वापर करुन ते तिच्या कडून हिरावून घेवून शारिरिक, भावनिक किंवा दोन्हीही प्रकारची महिलेला अपमानित करणे, तिला हिणवणे किंवा धमकावणे, अपत्य नसल्यामुळे त्रास देणे, दुखापत करणे या सगळयांचा परिणाम पिडीत व्यक्ती



Scanned with OKEN Scanner

किंवा तिच्या नातवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे, आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित ठेवणे, घराबाहेर काढणे इत्यादींचा समावेश कौटुंबिक हिंसाचारात होतो.

**कौंटुबिक हिंसाचार अधिनियम २००५ :-**

भारत सरकारने महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून मुक्त करण्यासाठी, महिलांना संरक्षण देण्यासाठी कौंटुबिक हिंसाचार अधिनियम २००५ मध्ये कायदा अस्तित्वात आणला. कायद्याच्या आधारे महिलांना खऱ्या अर्थाने संरक्षण देण्याचे कार्य करण्यात आले. या कायद्याअंतर्गत महिला आणि मुले यांना या कायद्याद्वारे संरक्षण मिळू शकते. पत्नी, बहिण, आई, वहिणी, मुलगी तसेच एकत्र कुटुंबात राहणाऱ्या व नाते संबंधातील कुठल्याही महिलेला कौटुंविक छळ, अत्याचाराच्या विरोधात संरक्षण मिळू शकते. मुलांना सुध्दा त्यांचा मानसिक, शारिरीक, आर्थिक व लैंगिक छळ करणाऱ्या पालका विरुध्द तक्रार करता येते. हा कायदा केवळ लग्न झालेल्यांच्या पुरताच मर्यादित नसून एखादी स्त्री आपल्या जोडीदारासोबत लग्नाशिवाय एका घरात राहत असेल, तरी ती सुध्दा या कायद्याच्या आधारे न्याय मागू शकते.

**महिलांचे अधिकार :-**

समाजामध्ये वेगवेगळया पातळीवर कुटुंबातील महिलांवर कौटुंबिक हिंसाचार होतं असतो. आणि होणारा अन्याय, त्रास, महिला सहन करत असतात. समाजातील लोक जेव्हा एखादा कुटूंबात पती-पत्नीमध्ये भांडणे होतात. पत्नीला त्रास दिला जातो. तेंव्हा इतर कोणीही बोलत नाही कारण ते पती-पत्नी मधील भांडण आहे म्हणून आणि जेंव्हा कोणी बोलले तर त्यामध्ये महिलांची कशी चूक आहे हेच स्पष्ट केले जाते. त्यामुळे महिलांची मानसिक कोंडी निर्माण होते. शिवाय आपल्याला काही अधिकार आहेत. आपणाला अन्यायाविरुध्द न्याय मागता येईल. त्या संदर्भात कायदे आहेत. पोलिसामध्ये तक्रार करता येईल काय? याची माहिती नसते. त्यामुळे महिलांवर अन्याय वाढत जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे महिलांना काही अधिकार न्याय मागण्यासाठी कायदे आहेत. याचे ज्ञान असणे गरजेचे आहे. कौटुंविक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षक करणाऱ्या कायद्यामध्ये महिलांचे असणारे अधिकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- महिला स्वतः वर किंवा मुलांवर होणारे अत्याचार थांबवू शकते.
- कुटूंबातील पती वा नवरा जोडीदार त्यांचे नातेवाईक सासू-सासरे, यांच्या प्रतिवादी म्हणून तक्रार करु शकते.
- प्रतिवाद्यांकडून तुमच्यासाठी आणि तुमच्या उपजिवीकेसाठी खर्च मागु शकता.

- प्रतिवाद्यांकडून होणाऱ्या शारिरीक दुखापतीच्या वैद्यकीय उपचारासाठी खर्चासहित नुकसान भरपाई मागता येते.
- प्रतिवाद्यामुळे जर नोकरी गेली असेल किंवा व्यवसाय गमवावा लागला असेल तर त्याबद्दल नुकसान भरपाई मागता येते.
- कलम ४९८ अ अंतर्गत पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करता येते.

अशा वेगवेगळया प्रकारच्या बाबतीत महिलांना व मुलांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द दाद मागता येते. त्या अनुषगांने कौटुबिक हिंसाचार कायद्यात तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

**कौटुंबिक हिंसाचाराची कारणे:-**

स्त्रियांचे प्रश्न हे निसर्ग दत्त नसून मानवनिर्मित आहेत व त्याची मुळे पुरुष प्रधान संस्कृतीत दिसून येते. स्त्री पेक्षा पुरुष श्रेष्ठ, लिंगसापेक्ष श्रम विभाजन लादून त्यांची एक विशिष्ट प्रतिमा निर्माण करुन स्त्री व्यक्तिमत्वाचा कोंडमारा केला गेला आहे. श्रेष्ठ व कनिष्ठत्वाची भावना निर्माण करुन कौटुंबिक हिंसाचार वाढीस लागले आहेत. त्यांची काही कारणे.

पुरुषप्रधान कुटूंब व्यवस्था, आर्थिक परावलंबन, स्त्रीचा आक्रमकतेचा अभाव, मुलगी परक्याचे धन.

कौटुंबिक हिंसाचार भारतीय समाजामध्ये वेगवेगळया कारणामुळे होत असलेले दिसून येते. हुंडा-प्रथा असेल, घरगुती कामे, सासु-सुनेचे भांडण, दिर-भावजाई भांडण असेल अशी अनेक कारणे आहेत की, महिलांचे शारिरीक, लैंगिक, मानसिक, भावनिक अशा पध्दतीने शोषण केले जाते.

**स्त्रियांच्या सामाजिक समस्या:-**

महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात म्हणजे बंधनाच्या जोखडयातून स्त्री जातीला मुक्त करण्यासाठी केलेले समाज परिवर्तनाचे कार्य हे फार मोठे योगदान स्त्रियांच्या उध्दारासाठी महात्मा फुलेनीं केले. महात्मा फुल्यांनी शेतकरी शूद्रतिशूद्र व स्त्रिया यांचा प्रश्न पुढे आणला. ब्राम्हणीधर्म व जातीभेद या विधात लढयाचा संदेश दिला. त्यांनी जातीव्यवस्था आणि पुरषसत्ता हया स्त्री शोषणाच्या प्रमुख व्यवस्था आहेत असे मतप्रतिपादन सर्वात प्रथमच केले.

डॉ. गेल ऑम्व्हेट यांच्या मते जोतीबांनी स्त्री मुक्तीची स्पष्ट भूमिका घेतली होती ती केवळ स्त्रियांचा उध्दार होईल या पातळीवर नव्हती तर पुरषांकडून स्त्रियांवर लादली गेलेली गुलामगिरी नष्ट होणे आवश्यक आहे अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री-मुक्तीच्या विचारांचा अभ्यास केला तर स्त्रिया जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहे अशी मांडणी त्यांनी जातिव्यवस्थेच्या



Scanned with OKEN Scanner

निर्मितीच्या सिध्दांतातून प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे महाड येथे सत्याग्रह परिषदेसमोर त्यांनी केलेल्या भाषणातून हेच सूत्र व्यक्त होते.

भारतासारख्या विकसनशिल देशात खूल्या अर्थव्यवस्थेच्या नावाखाली वाढलेल्या खाजगीकरणामुळे एकंदर गरिबी वाढत आहे आणि दारिद्र्य रेषेखाली असलेल्या कुटुंबाची संख्या वाढत आहे. अशा कुटुंबामध्ये स्त्री-कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे अधिक प्रमाणात आहेत. स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गावापासून ते देश पातळीपर्यंत सर्व राजकीय संस्थामध्ये स्त्रियांना आरक्षण दिले आणि या माध्यमातून स्त्रियांना सक्षम बनविण्याचे प्रयत्न केले गेले. परंतू आज देखील आरक्षणाच्या ठिकाणी निवडून आलेल्या महिला खरंच अन्याय, अत्यांचार, हिंसाचारापासून परावृत आहेत का असे कोणालाही विचारले असता, त्यांचे उत्तर नकारात्मकच येईल. कारण की, महिलांना विकासाच्या प्रक्रियेत आणायचे असेल तर पुरुषसत्ता व्यवस्थेत बदल होणे गरजेचे आहे. सर्वप्रथम प्रत्येक व्यक्तींची जबाबदारी काय आहे. स्वतःची नैतिकता स्वतः जोपासली पाहिजे. आपल्या आई, बहिण, बायको, वहिणींची जशी आपण काळजी घेतो. तशीच आपण सर्व महिलांविषयी काळजी घेतली, सरंक्षण दिले तर महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, छळ निश्चितच कमी होऊ शकते. आज २१ व्या शतकात देखील आपणास महिलांच्या समस्यांचे अभ्यास करणे गरजेचे वाटत आहे. कारण की, कौंटुंबिक हिंसाचाराच्या बाबतीत महिलांवरील हिंसाचाराचे प्रमाण फारच जास्त प्रमाणात आहेत, असेच म्हणावे लागेल. परंतू आज परिवर्तन होणे गरजेचे आहे. स्त्रियांना विकासाच्या केंद्रस्थानी आणून दैनंदिन जीवनात सर्व क्षेत्रामध्ये गुणवत्तेनुसार काम करण्यांची संधी दिल्यास महिला देखील सक्षमपणे उभी राहू शकते. त्यासाठी पुरुषसत्ता व्यवस्थेची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष:-**

- कौंटुंबिक हिंसाचार हा शारिरीक, मानसिक, लैंगिक, आर्थिक अशा वेगवेगळया प्रकारे केला जातो.
- अनेक स्त्रिया माहेरची बदनामी होऊ नये म्हणून होणारा अत्याचार सहन करीत असतात.
- स्त्रिया आपली बदनामी होऊ नये म्हणून पोलिसामध्ये तक्रार करण्यासाठी पुढे येत नाहीत.
- कौटुंबिक हिंसाचाराचा परिणाम म्हणून आज मुलगी नकोशी झाली आहे. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्यामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.



Scanned with OKEN Scanner

- कौटुंबिक हिंसाचाराचा कायदा सर्व स्तरातील महिलांना माहिती होणे गरजेचे आहे.
- कौटुंबिक हिंसाचार रोखण्यासाठी कायदा असून चालणार नाही तर त्याची कठोर अमलबजावणी झाली पाहीजे.

महिलांवरील कौटुंबिक हिंसाचार थांबविण्यासाठी हा कठोर व निर्णायक कायदा राज्य आणि देशात लागू केला परंतू जोपर्यंत महिला अन्यायाचा प्रतिकार करत नाहीत, प्रसंगी कायद्याचा आधार घेत नाहीत, तोपर्यंत त्या कौटुंबिक हिंसाचारांच्या विळख्यातून बाहेर येणार नाहीत.

महिला कुटुंब आणि समाजव्यवस्थेत निभिडपणे वागणार नाहीत तोपर्यंत असे हिंसाचार कमी होणार नाहीत.

**संदर्भः-**

१) साळुंखे आ. ह. (२००८) हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ:मयगृह, मुंबई.
२) काळदाते सुधा (२००५) भारतीय समाज- प्रश्न आणि समस्या, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
३) गोटे-गव्हाणे सुभांगी (२००४) महिला सबलीकरण, स्वरुप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
४) देहाडराय सरिता, वृषाली, (१९९९) भारतीय सामाजिक चळवळ, प्राची प्रकाशन, मुंवई.
५) राठोड ईश्वर (संपादक) (२०१८) महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय, राष्ट्रीय चर्चासत्र.

❑❑❑



Scanned with OKEN Scanner

# CONTENTS

1. नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक दर्जा -नागपूर शहरातील महिलांचा चिकित्सक अभ्यास | **डॉ. सीमा अतुल पांडे** 7

2. मी टु चळवळ आणि कामकाजी महिला | **डॉ. अंजली जोशी -टेंभुर्णीकर** 12

3. महिला सबलीकरण आणि समाज दृष्टिकोन | **अनिता एस. गायकवाड** 20

4. ग्रामीण व शहरी कामकाजी महिलांच्या समस्या व त्यावरील उपाय आणी महिला आयोगाची भूमिका | **डॉ. जयश्री देशमुख** 23

5. भारतातील महिलांच्या समस्या आणि कायदे | **बळीराम पवार** 28

6. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम- २००५ आणि स्त्रियांच्या सामाजिक समस्या | **ईश्वर लक्ष्मण राठोड** 32

7. भारतीय दंड संहितेतील महिला विषयक कायदे | **डॉ. प्रतिभा रं. बिरादार** 38

8. नोकरदार महिलांच्या कौटुंबिक समस्या | **डॉ. मारोती भोसले** 42

9. घरेलु कामगार महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास | **मनेष गंगाराम खटावे, डॉ. ए. टी. तवार** 46

10. स्त्रीवाद : वस्तुस्थिती आणि विपर्यास | **डॉ.सा.द.सोनसळे** 54

11. स्त्री स्वातंत्र आणि समाज | **डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे** 59

12. घरकाम करणाऱ्या मोलकरीन महिलांच्या समस्या व त्यावर उपाययोजना | **डॉ. बी.ए. साबळे** 63

13. महीला सबलीकरण व मानवी हक्क | **फाजगे ए. के.** 67

14. महिलांचे कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण | **जाधव सुलोचना** 71

15. कामकाजी महिला सुरक्षेत महिला आयोगाची भुमिका | **सुचित्रा शेषराव लढे** 75

16. 'मी टु'एक ऑनलाइन चळवळ | **डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** 80

17. कामकाजी महिलांच्या कार्यालयीन व कौटुंबीक समस्या | **स्वाती विकासराव कुरमे** 85

18. महिला हिंसाचाराच्या समस्या | **नागनाथ निवृत्ती तेलंगे** 90



Scanned with OKEN Scanner